**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३४/२०१६-१७/२१९ दिनांक: २६-१२-२०१६

**आदेश**
**आदेश केस क्र. ३४/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. बाबासाो लक्ष्मण जौंदाळ<br>मु. पो. शिवाजी गल्ली वडणगे<br>ता. करवीर, जिल्हा. कोल्हापूर : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग-१ कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग कदमवाडी | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. नि.बा. बारसिंग, सदस्य सचिव,(प्रभारी)
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री बाबासो लक्ष्मण जौंदाळ रा. वडणगे ता. करवीर जि. कोल्हापूर यांनी कृषि पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी वितरण कंपनीकडे दिनांक ०८-११-२०१३ रोजी अर्ज करुन दि. २७-०२-२०१५ रोजी फर्म कोटेशन मिळालेनंतर दि. ०६-०४-२०१५ रोजी वीज जोडणीची रक्कम भरली. त्यांना तीन महिन्यात जोडणी मिळाली नाही. तक्रारदार यांनी दि. १०-१०-२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे दाद मागितली. तथापि सदर कक्षाने दि. १७-११-२०१६ च्या आदेशाने नुकसान भरपाईची मागणी फेटाळून जेष्ठता यादीनुसार जोडणी देणेत येईल असा निर्णय दिल्याने तक्रारदार या मंचासमोर गा-हाणे घेऊन आले आहेत.

२) वितरण कंपनीने लेखी निवेदन सादर केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, जेष्ठता यादीनुसार इन्फ्रा-२ अंतर्गत काम सतेज इलेक्ट्रीकल्स यांचेकडून चालू असून २०१३-१४ पर्यन्तची कामे पूर्ण केली आहेत. तक्रारदार यांनी दि. ०६-०४-२०१५ रोजी रक्कम भरली होती. त्यामुळे त्यांना जेष्ठता यादीप्रमाणे मंजूर असलेले काम पूर्ण झाल्यानंतर, नविन वीज जोडणी देता येईल.

३) या प्रकरणाची सुनावणी दि. २३-१२-२०१६ रोजी मंचासमोर घेणेत आली. मंचाचे नियमित सदस्य सचिव श्री प्रदिप वि. खपली हे रजेवर असल्याने प्रभारी सदस्य सचिव श्री बारसिंग हे हजर होते.

सुनावणीचे वेळी तक्रारदार स्वतः हजर होते. वि.प. तर्फे सहाय्यक अभियंता संदिप जवाहिरे व कनिष्ठ अभियंता श्री रोहित बिरनाळे हजर होते. वरील सर्वाचा तोंडी युक्तिवाद ऐकणेत आला. सर्व उपलब्ध कागदपत्रे वाचण्यात आली आहेत.

४) तक्रारदार यांचे गा-हाणे, वितरण कंपनीचे लेखी निवेदन आणि तोंडी युक्तिवाद यांचा विचार करता या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात आणि त्यावरील निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

(अ) तक्रारदार यांच्या मागणी प्रमाणे त्यांना कृषिपंपासाठी नविन वीज जोडणी देणेचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय

(ब) तक्रारदार यांनी मागितल्याप्रमाणे पिकांची प्रतिवर्ष नुकसान भरपाई एक लाख रुपये मंजूर करता येईल काय?

उत्तरः- नाही.

(क) कोणता अंतिम आदेश ?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## <u>कारणमिमांसा</u>

५) उपलब्ध कागदपत्रांवरुन हे स्पष्ट होते की, तक्रारदार यांनी कृषिपंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेचा अर्ज दि. १८-११-२०१३ रोजी वि.प. यांचेकडे केला होता. त्यांना दि. २७-०२-२०१५ रोजी फर्म कोटेशन देणेत आलेनंतर त्यांनी दि. ०६-०४-२०१५ रोजी रक्कम रु. २७५०/- भरणा केली. त्यामुळे त्यांचे नाव सन-२०१५-१६ च्या प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले. परंतु त्यांचा अर्ज दि. १८-११-२०१३ रोजी

वि.प. कडे दाखल झाला होता ही बाब नजरेआड करता येणार नाही. त्यांना फर्म कोटेशन १४-१५ महिन्यानंतर देण्यात आले.

सन-२०१४-१५ पर्यन्तची प्रतिक्षा यादी प्रलंबित आहे असे दिसून येते.सन-२०१५-१६ च्या यादीत तक्रारदार यांचा प्रथम क्रमांक आहे.

६) वि.प. यांचे म्हणणे असे आहे की, तक्रारदार यांना वीज जोडणी दिल्यास प्रतिक्षा यादीतील पूर्वी नोंद झालेल्या शेतक-यावर अन्याय होईल. तथापि , तक्रारदार यांच्या युक्तिवादात बरेच तथ्य आहे. कृतिमानके विनियमाप्रमाणे तक्रारदार यांना विहित कालावधीत जोडणी मिळणेचा अधिकार प्राप्त झाला आहे. जर वितरण कंपनीस कृतिमानके साध्य करण्यास काही अडचणी येत असतील तर त्यांचे निवारण मा. विद्युत नियामक आयोगाकडून करुन घेणे अनिवार्य राहिल.

७) वरील कारणास्तव, तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे वीज जोडणी देणेचा आदेश करणे योग्य होणार आहे. त्यांनी या प्रकरणात पिकांचे दरसालचे नुकसान म्हणून एक लाख रुपये भरपाई मागितली आहे. तथापि अशा स्वरुपाची भरपाई या मंचाकडून देता येणार नाही. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मचं व विद्युत लोकपाल) विनियम २००६ च्या कलम ८.२ प्रमाणे अप्रत्यक्ष, परिणामरुप, अनुषंगिक , संधी अथवा लाभाचे नुकसान वगैरेसाठी भरपाई मिळण्याचा ग्राहकाला हक्क रहात नाही.

वर नमूद केलेल्या परिस्थितीत तक्रारदार यांचा प्रस्तुतचा गा-हाणे अर्ज खालील प्रमाणे अंशतः मंजूर केला जाणेस पात्र आहे. सबब खालील प्रमाणे आदेश.

**आदेश**

१) तक्रारदार - श्री बाबासो लक्ष्मण जौंदाळ रा. वडणगे ता. करवीर जि. कोल्हापूर (ग्राहक क्र. २६६५५०७०२१४२) यांना त्यांच्या मागणी प्रमाणे कृषिपंपासाठी नविन वीज जोडणी नियमानुसार , या निर्णयाच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत वि.प. यांनी द्यावी असा वि.प. यांना आदेश देण्यात येत आहे.

२) तक्रारदार यांची भरपाई मिळणेची मागणी नामंजूर करण्यात येत आहे.

३) तक्रारदार यांचा वीज जोडणी अर्ज दिनांक १८-११-२०१३ रोजी वितरण कंपनीस देऊन सुध्दा दि. २७-०२-२०१५ रोजी त्यांना अत्यंत विलंबाने फर्म कोटेशन का दिले याबाबत संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी करुन जरुर तर योग्य ती कारवाई करणेत यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/ |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (नि.बा. बारसिंग) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |